विशेष/ध.आ./मु.सा.वि/२ म

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग, पुणे येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव नागदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान, पुणे, सारसबाग सदन, २५९, नवी पेठ, पुणे ३०

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ. ७०५० (पुणे)

श्री. दिनेश प्रभाकर वराडे, मु. पो. वारजे, ता. हवेली, जिल्हा पुणे यास प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक १६/५/१९९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का DEPUTY CHARITY COMMISSIONER PUNE REGION

सही (सही)

धर्मादाय उप-आयुक्त

पदनाम] पुणे विभाग, पुणे

(सही)

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय पाडळी
ता. खेड, जि. पुणे

31

[ विशेष—ध.आ. ५० म.

क्रमांक №

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र /१२७७/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, आनंदराव मोलाक विद्या व क्रिडा प्रतिष्ठान पुणे ........................

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्य रीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख ....७....८.... १९९७ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETY, PUNE
PUNE REGION.

संस्थांचे सहायक निबंधक,

........पुणे........ विभाग.

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय पाडळी
ता. खेड, जि. पुणे

// श्री //

' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । '

SUBHASH BHIKU TODKAR
NOTARY
STATE OF
MAHARASHTRA
PUNE
PUNE

**नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान**

**नवी पेठ, पुणे.**

[illegible]

1. **संस्थेचे नाव** : नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान, पुणे ( या पुढे संक्षेपासाठी ट्रस्ट अगर सोसायटी या नावाने उल्लेख केला जाईल.)

2. **संस्थेचे कार्यक्षेत्र** : संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य राहील.

3. **संस्थेचे कार्यालय** : साऊली सदन, 249 नवी सदाशिव पेठ, पुणे - 30 येथे राहील.

4. **संस्थेचे उद्देश** : 1) सर्व प्रकारचे शैक्षणिक कार्य करणे, बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक महाविद्यालये, तंत्रशाळा, अध्यापक विद्यालय, शिक्षण शास्त्र महाविद्यालय (बी.एड्.कॉलेज) , तांत्रिक वैद्यकीय संस्था तसेच विविध शैक्षणिक विभागातील संशोधन संस्था, व्यावसायिक शिक्षणाच्या सर्व संस्था, व्यवस्थापन विषयक शिक्षण संस्था वगैरे सर्व प्रकारची शैक्षणिक केंद्र व संस्था स्थापन करणे व चालविणे. तसेच चालू असलेल्या अशा प्रकारच्या संस्था चालविणे व चालविण्यासाठी घेणे. विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थीनींसाठी वसतीगृहे स्थापन करणे व चालविणे. अभियांत्रिकी महाविद्यालये चालविणे.

4-2 व्यायाम शाळा, सांस्कृतिक केंद्रे व संस्कार केंद्रे स्थापन करुन ती चालविणे, विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धा आयोजित करणे अगर अशा प्रकारच्या क्रिडा स्पर्धांना मदत करणे. व्यायामाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना अथवा क्रिडापटूंना आर्थिक मदत करणे अथवा शिष्यवृत्ती देणे. प्रस्थापित क्रिडा केंद्रांना वस्तू रुपाने अगर रोख आर्थिक मदत करणे. तसेच सांस्कृतीक व संस्कार क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना मदत करणे. क्रिडा व संस्कृती चळवळीस पूरक होईल असे कोणतेही काम करणे.

4-3 विद्यार्थ्यांना बक्षिसे, शिष्यवृत्या देणे, वस्तू रुपाने अगर रोख रक्कम रुपाने मदत करणे.

4-4 व्याख्याने परिसंवाद, कार्यशाळा आयोजित करणे.

4-5 नियतकालिके, अथवा स्मरणिका पत्रके, पुस्तके प्रसिध्द करणे, वाचनालये, फिरती वाचनालये आदी चालविणे.

4-6 संस्थेच्या उद्देशाप्रमाणेच समान उद्दीष्टे असलेल्या संस्थांना देणग्या व मदत देणे.

4-7 वरील उद्देशासाठी इतर संस्थांशी सहभाग करणे, अथवा वरील उद्दीष्ट पूर्तीसाठी जरूर ते सहकार्य करणे.

5. संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्यांचेवर संस्थेच्या व्यवस्थापनेची जबाबदारी विर्हीत केली आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळातील/व्यवस्थापन समितीचे सभासदांची नावे, पत्ते, वय, व्यवसाय, संस्थेतील पद वगैरे महिती खाली दिल्याप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | विश्वस्त सभासदांची संपूर्ण नांव व पत्ता | वय | व्यवसाय | संस्थेतील पद |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. अशोक नामदेवराव मोहोळ<br>नवी पेठ, पुणे - 30 | 49 | शेती/धंदा | अध्यक्ष |
| 2. | श्री. सदानंद नामदेवराव मोहोळ<br>साऊली सदन, 249 नवी पेठ, पुणे. | 52 | शेती/धंदा | कार्याध्यक्ष |
| 3. | श्री. आनंदराव दत्तात्रय काळे<br>सहजीवन सो.सा शिवाजीनगर, पुणे. | 61 | वकीली | उपाध्यक्ष |
| 4. | श्री. दिलीप प्रभाकर बराटे<br>मु.पो. बारजे, ता. हवेली, जि. पुणे-29 | 30 | शेती/धंदा | खजिनदार |
| 5. | श्री. गहिन्नाथ पाटीलबा ढाकणे<br>मु.पो. कडूस, ता. खेड, जि. पुणे. | 37 | नोकरी | कार्यवाह |
| 6. | श्री. रामचंद्र शंकरराव मते<br>सह्याद्री 47 नॅशनल हौ.सो. औंध, पुणे -7 | 50 | कॉन्ट्रक्टर | विश्वस्थ |
| 7. | श्री. नयन शशीकांत बंब<br>दिपक डिस्ट्रीब्युटर्स, लक्ष्मी रोड, पुणे -30 | 29 | व्यापार | विश्वस्थ |
| 8. | श्री. विठ्ठल विठोबा नवले<br>353 शनिवार पेठ, पुणे | 52 | शेती | विश्वस्थ |
| 9. | पं. भिमसेन गुरुराज जोशी<br>38 लक्ष्मी पार्क कॉलनी, नवी पेठ.<br>पुणे- 30 | 70 | गायक | विश्वस्थ |
| 10. | श्री. मधुकरराव नामदेवराव मोहोळ<br>वसई पार नाका, ठाणे. | 55 | शेती/धंदा | विश्वस्थ |
| 11. | डॉ. रमेश सोनबा डुंबरे<br>ऐश्वर्या 99/4 एरंडवणा, पुणे-4 | 42 | डॉक्टर | विश्वस्थ |
| 12. | श्री. विश्वासराव खंडेराव मुळाणे<br>माऊली अपार्टमेंट, नवी पेठ, पुणे-30 | 55 | कॉन्ट्रक्टर | विश्वस्थ |
| 13. | श्री. बाळासाहेब शंकरराव गांजवे<br>कोहिनूर आर्ट, गांजवे चौक, पुणे. | 38 | व्यापार | विश्वस्थ |

6. आम्ही सर्वजण आम्हां सर्वजणांची 1860 ची संस्था नोंदणी अधिनियमानुसार 'नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान' पुणे या नावाची संस्था नोंद करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन सदर ज्ञापनावर आज दिनांक 5 जुले 1991 रोजी सह्या केल्या आहेत.

......3/-

खजिनदार

उपाध्यक्ष

| अ.क्र. | विश्वस्त सभासदांचे संपूर्ण नांव व पत्ता | वय | सही. |
|---|---|---|---|
| 1. | श्री अशोकराव नामदेवराव मोहोळ<br>मोहोळ, नवी पेठ, पुणे - 30. | 49 | |
| 2. | श्री विदुरा विठोबा नवले<br>353 शनिवार पेठ, पुणे - | 52 | |
| 3. | श्री आनंदराव दत्तात्रय काळे<br>सहजीवन हौ.सौ. कृतज्ञता पुणे. | 61 | |
| 4. | पं.भिमसेन गुरुराज जोशी<br>38 लक्ष्मी पार्क कॉलनी,नवी पेठ,<br>पुणे.30 | 70 | |
| 5. | श्री मधुकरराव नामदेवराव मोहोळ<br>वसई पार नाका, ठाणे. | 55 | |
| 6. | श्री रामचंद्र शंकरराव मते<br>सहयाद्री 47 नॅशनल हौ.सौ.औंध,पुणे-7 | 50 | |
| 7. | डॉ.रमेश सोनबा डुंबरे<br>ऐश्वर्या 99/4 एरंडवणा, पुणे - 4. | 42 | |
| 8. | श्री.नयन शशीकांत बंब<br>दिपक डिस्ट्रीब्युटर्स,लक्ष्मी रोड,पुणे 30. | 29 | |
| 9. | श्री सदानंद नामदेवराव मोहोळ<br>साऊली सदन ,249 नवी पेठ,पुणे - 30. | 52 | |
| 10. | श्री विश्वासराव खंडेराव भुळाणे<br>माऊली अपार्टमेंट, नवी पेठ, पुणे - 30. | 55 | |
| 11. | श्री बाळासाहेब शंकरराव गांजवे<br>कोहिनूर आर्ट, गांजवे चौक,पुणे. | 38 | |
| 12. | श्री दिलीप प्रभाकर बराटे<br>मु.पो.वारजे,ता.हवेली,जि.पुणे. | 30 | |

13. श्री गहिन्नाथ पाटीलबा ढाकणे 37
मु.पो.कडूस, ता. खेड,
जि.पुणे.

[redacted]
B. R. TODKAR
NOTARY STATE OF MAHARASHTRA
PUNE
5/7/1991.

---

ठिकाण - पुणे
दिनांक - 5 जुलै 1991

SUBHASH R. TODKAR
MAHARASHTRA
NOTARIAL
PUNE

विशेष कार्यकारी दंडाधिकारी
पुणे

वरील सह्या मी ओळखतो

नाव :
पत्ता :

बापूराव शामराव बराटे
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
मु. पो. वारजे, ता. हवेली, जि. पुणे

---

प्र मा ण प त्र
=========

असे प्रमाणपत्र देण्यात येते की, आमचे उत्तम माहितीप्रमाणे नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्टान, पुणे या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था पुणे ( महाराष्ट्र ) या शहरात 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी अस्तित्वात नाही.

ठिकाण : पुणे
दिनांक : 5 जुलै 1991

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

## दाखला

प्रमाणित करण्यात येते की , नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान , पुणे या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| पदाधिकाऱ्यांची नावे | | सही /- |
|---|---|---|
| 1. श्री अशोकराव नामदेवराव मोहोळ | अध्यक्ष | |
| 2. श्री आनंदराव दत्तात्रय काळे | उपाध्यक्ष | |
| 3. श्री गहिनीनाथ पाटीलबा ढाकणे | कार्यवाह | |

**नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान**

**नवी पेठ, पुणे.या संस्थेची**

**नियम व नियमावली**

1. **संस्थेचे नाव :** नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान, पुणे

2. **संस्थेचे कार्यक्षेत्र :** संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य राहील.

3. **संस्थेचे कार्यालय :**साऊली सदन, 249 नवी सदाशिव पेठ, पुणे - 30 येथे राहील.

4. **विश्वस्थ मंडळाचे पदाधिकारी :** विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे राहातील. एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक कार्यवाह, एक खजिनदार व 9 विश्वस्त राहातील.

5. **कार्यकारी समिती :** विश्वस्त मंडळ विश्वस्तामधून 7 जणांची कार्यकारी समिती निवडतील. विश्वस्त मंडळाचे कार्यवाह हेच कार्यकारी समितीचे कार्यवाह असतील. कार्यकारी समिती आपल्यामधून एकाची कार्याध्यक्ष म्हणून निवड करतील. कार्यकारी समितीची मुदत पाच वर्षे राहील.

6. **विश्वस्तांची मुदत :** विश्वस्तांची मुदत त्यांचे आयुष्यभर राहील. मृत्यू राजीनामा, काम करण्याची शारीरीक अथवा मानसिक अकार्यक्षमता विश्वस्त म्हणून काम करण्यास नकार देणे, नादारी, नैतिक गुन्हयासाठी कारावासाची शिक्षा या कारणावरुन विश्वस्तांचे पद रिकामे झाले असा निर्णय विश्वस्त मंडळाने बहुमताने घेतल्यास त्या विश्वस्ताचे पद संपुष्टात येईल. व त्याचे जागी उरलेले विश्वस्त कोणंत्याही सज्ञान इसमाची विश्वस्त म्हणून नेमणूका करतील.

7. **विश्वस्त मंडळाची कमाल व किमान संख्या :** विश्वस्त मंडळातील विश्वस्तांची कमाल संख्या 13 व किमान संख्या 7 राहील. विश्वस्त मंडळातील विश्वस्तांची संख्या ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा कमी असेल व अशा विश्वस्त मंडळाने घेतलेले निर्णय व ठराव हे किमान संख्येअभावी बेकायदा ठरणार नाही. विश्वस्त मंडळातील रिकाम्या असलेल्या जागा भरण्याचा अधिकार विश्वस्त मंडळातील विद्यमान विश्वस्तांना राहील.

8. **विश्वस्त मंडळ व कार्यकारी समितीतील पदाधिका-यांची कामे :**

8-1 विश्वस्त मंडळ संस्थेच्या ध्येय धोरणाची आखणी करणे, तसेच संस्थेच्या मालमत्तेवर नियंत्रण ठेवणे, कार्यकारी समितीस मार्गदर्शन करणे, आणि संस्थेच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे ही विश्वस्त मंडळाची कामे राहतील.

8-2 कार्यकारी समिती ही संस्थेच्या दैनंदिन कामकाजास जबाबदार राहील. विश्वस्त मंडळाने ठरवून दिलेल्या ध्येय धोरणानुसार संस्थेच्या उद्दीष्ट पूर्तीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना करणे. संस्थेशी संलग्न असणा-या विद्यालये व इतर संस्था यांचा कारभार पहाणे. ही कार्यकारी समितीची कार्ये राहातील.

8-3 विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष : विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष हे विश्वस्त मंडळाच्या सभांचे अध्यक्षपद भुषवतील. विश्वस्त मंडळाच्या सभेत एखाद्या विषयावर समसमान मते पडल्यास जादा मत देण्याचा अध्यक्षांस अधिकार राहील.

8-4 विश्वस्त मंडळाचे उपाध्यक्ष : विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षाच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष विश्वस्त मंडळाच्या सभेचे अध्यक्षस्थान भुषवतील व त्या वेळी त्यांना अध्यक्षाप्रमाणे अधिकार राहतील.

8-5 विश्वस्त मंडळाचे कार्यवाह : विश्वस्त मंडळाचे कार्यवाह हे संस्थेच्या कार्यकारी अधिकारी राहातील. कार्यवाह या नात्याने संस्थेच्या कामकाजास जबाबदार राहातील. विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारी समित्यांच्या सभा अनुक्रमे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष यांच्या संमतीने बोलावणे व त्या सभांची इतिवृत्ते ठेवणे, संस्थेचा पत्रव्यवहार पहाणे, संस्थेच्या मालमत्तेची निगा राखणे, व विश्वस्त मंडळाने अध्यक्ष व कार्यकारी समिती चे कार्याध्यक्ष यांनी सांगितलेली काम पहाणे हे कार्यवाहाचे काम राहील.

8-6 विश्वस्त मंडळाचे खजीनदार : विश्वस्त मंडळाचे खजिनदार हे संस्थेचे हिशोब ठेवतील. अगर ठेवण्याची कार्यवाही करतील. संस्थेकडे आलेल्या रकमाच्या पावत्या देणे. वार्षिक अंदाजपत्रक व ताळेबंद तयार करणे, व ते कार्यकारी समिती व विश्वस्त मंडळाच्या समोर मान्यतेसाठी सभेपुढे ठेवणे. तसेच संस्थेचे हिशोब ऑडिट करुन घेऊन योग्य त्या अधिका-यापुढे दाखल करणे. ही खजिनदाराची कामे राहातील.

9. विश्वस्त मंडळ व कार्यकारी समितीच्या सभा : विश्वस्त मंडळाच्या वर्षातून किमान दोन सभा होतील. विश्वस्त मंडळाच्यां अध्यक्षांना त्यां खेरीज विशेष सभा बोलावण्याचा अधिकार राहील. कार्यकारी समितीची दर महिन्यातून किमान एक सभा होईल. त्या खेरीज कार्याध्यक्षांना विशेष सभा बोलावण्याचा अधिकार राहील. विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारी समितीच्या सभांची सूचनापत्रे मा. अध्यक्ष, कार्याध्यक्ष यांच्या संमतीने कार्यवाह सभेपूर्वी सात दिवस अगोदर काढतील. सदरची सूचनापत्रे जाहीरा पोस्टाने अथवा प्रत्यक्षरित्या देण्यात येतील.

10. गणसंख्या : विश्वस्त मंडळ व कार्यकारी समितीचे सभांसाठी 1/3 सभासदांची गणसंख्या ठरविण्यात येईल. मात्र गणसंख्या पूर्ती न झाल्यास अध्यक्ष अथवा कार्याध्यक्ष सभा अर्धा तास तहकूब करुन त्याच ठिकाणी तहकूब सभा घेऊ शकतील व अशा तहकूब सभेत गणसंख्या पूर्तीची अट राहणार नाही.

11. **मागणी सभा :** विश्वस्त मंडळाचे पाच सभासद अथवा कार्यकारी समितीचे तीन सभासद अनुक्रमे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व कार्यकारी समितीचे कार्याध्यक्ष यांचेकडे लेखी मागणी करुन सदर मागणी ज्या विषयासाठी सभा बोलावयाची तो विषय नमुद करुन मागणीपत्रक देतील तर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांना सदर मागणीनुसार विश्वस्त मंडळ व कार्यकारी समिती यांच्या सभा मागणीपत्रक मिळाल्यापासून 15 दिवसात बोलाविता येतील. मात्र विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी सदर मागणी पत्रकानुसार सभा न बोलाविल्यास मागणी करणारा कोणताही विश्वस्त नियमानुसार सभा बोलावू शकेल व त्या सभेत झालेले कामकाज वैध व बंधनकारक राहील.

12. **परीपत्रक सभा :** नैमित्तीक व तातडीच्या विषयासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व कार्यकारी समितीचे कार्याध्यक्ष अनुक्रमे विश्वस्त मंडळाची व कार्यकारी समितीची सभा परीपत्रकान्वये घेऊ शकतील. मात्र परीपत्रकात नमुद केलेल्या विषयाबद्दल एकाही विश्वस्ताचा मतभेद राहणार नाही. अशा प्रकारचा मतभेद असल्यास सदरचा विषय पुढील नेहमीच्या सभेपुढे ठेवण्यात येईल.

13. **संस्थेचा निधी :** देणग्या सांस्कृतिक व इतर कार्यक्रमातून जमा होणारी रक्कम स्मरणिका अगर तत्सम प्रकारातून जमा होणारी रक्कम तसेच विश्वस्तांनी मान्य केलेल्या कोणत्याही प्रकाराच्या मार्गाने जमा होणारी रक्कम हा संस्थेचा निधी राहील.

14. **बँक खाते :** बँकेचे खाते हे संस्थेच्या नावाने राहील. कोणत्याही अनुसूचित अगर मान्य सहकारी बँकेत राहील. सदरचे खाते कार्याध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार या तीघांपैकी दोघांच्या सहीने चालविले जाईल

15. **आर्थिक वर्ष :** संस्थेचे आर्थिक वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च पर्यंत राहील.

16. **कर्ज उभारणी व स्थावर मिळकतीचे व्यवहार :** विश्वस्त मंडळास संस्थेसाठी कर्ज उभारण्याचा अधिकार राहील. त्यासाठी संस्थेची मिळकत तारण देण्यासाठी विश्वस्त मंडळास अधिकार राहील. विश्वस्त मंडळास संस्थेची स्थावर मिळकत विकणे अगर भाडयाने देणे या बाबत मुंबई पब्लीक ट्रस्ट अ‍ॅक्ट च्या 36 व्या कलमाला अधिन राहून अधिकार राहतील.

17. **नियमाच्या अर्थाबद्दलचा वाद :** संस्थेच्या सदर नियम व कानूच्या अर्थाबद्दल काही वाद अगर शंका निर्माण झाल्यास सदरचा प्रश्न मा. धर्मदाय सह आयुक्त पुणे विभाग यांच्याकडे सोपविण्यात येईल व त्यांचा निर्णय अखेरचा निर्णायक राहील.

18. **सोसायटी** रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट च्या अंकीत राहून संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करणे हा अधिकार विश्वस्त मंडळास राहील मात्र हा बदल विश्वस्त मंडळातील 3/4 सभासदाच्या अनुमतीने व्हावयास पाहिजे.

19. **संस्थेचे नाव** किंवा उद्देश यात बदल करतांना किंवा दोन संस्थांचे विलीकरण करतांना किंवा दोन संस्थेचे विलीणीकरण झालयास 1860 चे संस्था व नौंदणी अधिनियमातील कलम 12 व 12 अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

20. **संस्थेचे** विसर्जन करावयाचे झाल्यास 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमाप्रमाणे कलम 13 व 14 प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**कानू ( रेग्युलेशन्स )**

1. पुढे दिलेले कानू अगर नियम हे प्रशासनीय स्वरुपाचे राहतील व त्यांचा मुख्य उद्देश मार्गदर्शन करणे हाच राहील.

2. आर्थिक : अ) संस्थेकडे आलेल्या सर्व रकमांच्या पावत्या देणे. ब) किरकोळ खर्च वगळता रु. 1,000/- पेक्षा जास्त अधिक रकमेचा खर्च हा चेक द्वारे केला जाईल. क) संस्थेचे कार्यवाह अगर खजिनदार आपल्या हातात रु. 1,000/- पेक्षा अधिक रोख रक्कम ठेवणार नाहीत. सर्वसाधारणपणे अधिक रकमांचा भरणा बँकेत केला जाईल. नजीकच्या भविष्यकाळात खर्चाची अपेक्षा नसल्यास संस्थेचा निधी हा सुरक्षितपणे लांब मुदतीच्या ठेवीमध्ये गुंतविला जाईल.

3. पदाधिका-यांची कर्तव्ये : विश्वस्त मंडळाने ठरवून दिलेल्या ध्येय धोरणानुसार संस्थेचा ठराव अमलात आणणे हे काम अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह यांची संयुक्त व स्वतंत्र रित्या जबाबदारी राहील.

4. संस्थेचा नोकरवर्ग नेमणे , त्यांना नोकरीतून काढून टाकणे त्यांचे वेतनमान व इतर सेवाविषयक नियम ठरविणे ही कार्यकारी समितीची जबाबदारी राहील.

5. कार्यवाह महत्वाचा पत्रव्यवहार कार्याध्यक्षांच्या नजरेस आणतील व त्या बाबत कार्याध्यक्षांचे मार्गदर्शन घेतील. तातडीच्या कामासाठी खर्च करणे अगर कोणतीही उपाय योजना करणे हे कार्यवाहच्या अधिकारात राहील . मात्र अशा कारवाईस शक्य तितक्या लवकर कार्याध्यक्ष अथवा कार्यकारी समिति यांची कार्यवाहने मान्यता घेणे आवश्यक राहील.

6. कार्यकारी समिती संस्थेशी संलग्न असणा-या संस्था व केंद्रे या साठी विविध समित्या नेमू शकेल अशा समित्या व बिगर विश्वस्तांची नेमणुक करता येईल मात्र अशा समित्यांचे निर्णय शिफारस वजा राहतील व अंतीम निर्णय विश्वस्त मंडळ अथवा कार्यकारी समीती घेईल.